SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
" A++" Accrediated by NAAC (2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/बी.एड.२१/kop No 00415 दि. 26 JUL 2021

**प्रति,**
**मा. प्राचार्य/ संचालक,**
**जागृती शिक्षणशास्त्र महाविद्यालय,**
**ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर**

**विषय : आपल्या महाविद्यालयाच्या खालील अभ्यासक्रमांच्या संलग्नीकरण प्रकाराबाबत विद्यापीठाची मान्यता.**

**संदर्भ : १. आपला/आपले जा.क्र जे एस एस एम/१९/२०२०-२१ दि. २०/०८/२०२० रोजीचा/रोजीचे प्रस्ताव.**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाकडून जून, २०२१ पासून खालील संलग्नीकरण प्रकार व अभ्यासक्रमाचे प्रस्ताव मान्यतेकरीता प्राप्त झाले होते. स्थानिक चौकशी समितीने नमुद केलेल्या अटी पुर्ततेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाकडून सदर प्रस्तावास खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संलग्नीकरणाचा प्रकार | अभ्यासक्रम/शाखा | विद्यापीठाची मान्यता | ६५% पेक्षा कमी गुणांकन प्राप्त झालेले वर्ष |
|---|---|---|---|---|
| १. | नुतनीकरण/ नैसर्गिक विस्तार | **नुतनीकरण -** बी.एड.(५०) **अध्यापन पद्धत-** मराठी, हिंदी, इंग्लिश, इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान, अर्थशास्त्र | जून २०२१ पासून तीन वर्षासाठी | निरंक |

**स्थानिक चौकशी समिती/छाननी समितीने नमूद केलेल्या अटी खालीलप्रमाणे आहेत.**

१. इंग्रजी अध्यापन पद्धतीसाठी अध्यापकाची नियुक्ती करावी.

२. गणित अध्यापन पद्धतीसाठी अध्यापकाची नियुक्ती करावी.

**टिप :**

१. स्थानिक चौकशी समितीने नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयास भेट देवून विद्यापीठास सादर केलेल्या अहवालानुसार प्राप्त गुणांकन, छाननी समितीने दिलेला अभिप्राय व आपल्या महाविद्यालयास नियमित प्राचार्य, ग्रंथपाल, शारिरीक शिक्षण संचालक (आवश्यकतेनुसार) आणि संबधित अभ्यासक्रमामध्ये आवश्यक असणा-या शिक्षक पदांच्या विद्यापीठ निवड समितीमार्फत केलेल्या नियुक्त्या, शिक्षकेत्तर पदांच्या नियुक्त्या आणि इतर उपलब्ध आवश्यक भौतिक सुविधा इ. अवलोकनी घेवून विद्यापीठ अधिकार मंडळाने उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्यानुसार संलग्नीकरणाचे नुतनीकरण / नैसर्गिक विस्तार यास मान्यता दिली आहे.

Inward No. 08
Date 02/08/2021

...२

२. आपल्या महाविद्यालयास/संस्थेस आवश्यक असणारे नॅक/एनबीए मुल्यांकन/पुनर्मुल्यांकन केले नसल्यास ते त्वरित करून घेणे बंधनकारक राहील. याबाबतची पूर्तता झाली नसल्यास पुढील नुतनीकरण/नैसर्गिक विस्तार यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

३. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून पुढील सलग तीन वर्षामध्ये प्रपत्र 'अ', 'ब' किंवा 'क' मध्ये ६५% पेक्षा कमी गुण प्राप्त झाल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२० अन्वये संलग्नीकरण रद्द करण्याबाबतच्या प्रक्रियेचा प्रस्ताव विद्यापीठ अधिकार मंडळासमोर सादर करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची/नैसर्गिक विस्ताराची मान्यता ही स्थानिक चौकशी समितीने व छाननी समितीने घातलेल्या अटी पूर्ततेच्या अधीन राहून केली असल्याने महाविद्यालयाने सदरच्या सर्व अटींची पूर्तता करुन संबंधित कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह **अटीपूर्तता अहवाल या पत्राच्या दिनांकापासून दोन महिन्यात विद्यापीठास सादर करावा.** त्या अटींची पूर्तता केल्यानंतर व त्यास विद्यापरिषदेने मान्यता दिल्यानंतरच सदरच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाची मान्यता कायम केली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

**तसेच उपरोक्त मान्यतेचा कालावधी लक्षात घेऊन पुढील संलग्नता मान्यतेचा प्रस्ताव विहीत शुल्कासह विद्यापीठास मुदतीत सादर करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.**

कळावे,

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

प्रत :- १. पात्रता विभाग, २. संबंधित परीक्षा विभाग, ३. परीक्षक नियुक्ती विभाग,
४. अभ्यास मंडळे विभाग, ५. संलग्नता (शिक्षक मान्यता) विभाग, ६. पी.जी. प्रवेश